सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १७ जून २०२६

आतील पानावर
पान २–माधुरी व अनिल कपूरची जोडी पुन्हा एकत्र?
पान ३– ललित मोदींच्या बायोपिकमध्ये रणवीर सिंह?
पान ४– एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या बायोपिकमध्ये...
पान ५– प्राजक्ता माळीची साऊथमध्ये एन्ट्री
पान ७– 'डॉन ३'च्या वादात सलमान खानची एन्ट्री!



# टायगर अन् विद्युत एकत्र झळकणार

**बा**गी फ्रेंचाइजी चित्रपटांद्वारे टायगर श्रॉफने प्रेक्षकांदरम्यान स्वत:साठी खास स्थान निर्माण केले आहे. तर कमांडो फेम अभिनेता विद्युत जामवाल देखील स्वत:च्या जबरदस्त ॲक्शनसाठी ओळखला जातो. आता दोन्ही कलाकार एकत्रित दिसून येणार आहेत. टायगर आणि विद्युतने एक पोस्ट शेअर केली असून यात एआाय इमेजद्वारे निर्मित पोस्टर असून यात दोन्ही कलाकार दिसून येत आहेत. या पोस्टरवर 'दो लिजेंड, एक एपिक शोडाउन अशी कॅप्शन देण्यात आली आहे. तसेच टायगर श्रॉफ व्हर्सेस विद्युत असे लिहिले गेले आहे. या प्रोजेक्ट किंवा चित्रपटाला टी-सीरिजकडून निर्माण केले जाणार आहेत. याचाही उल्लेख पोस्टरवर करण्यात आला आहे. टायगर आणि विद्युतला अलिकडेच टी- सीरिजच्या कार्यालयाबाहेर पाहिले गेले आहे. टायगर हा मागील वर्षी 'बागी ४' या चित्रपटात दिसून आला होता. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला होता. तर विद्युत एक हॉलिवूडपट 'स्ट्रीट फायटर'मध्ये लवकरच दिसून येणार आहे. पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत. त्यामुळे प्रेक्षकांमध्येही या दोघींना एकत्र पाहण्यासाठी उत्सुकता आहे.



# हॉलिवूडच्या झगमगाटात रंगणार 'नाफा'



अमेरिकेतील भारतीयांच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेतील सर्वात प्रतिष्ठित आणि बहुचर्चित ठरलेल्या 'नाफा या मराठी चित्रपट महोत्सवा'च्या तिसऱ्या पर्वाची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, यंदाचा महोत्सव गेल्या दोन वर्षांपेक्षा अधिक भव्य, अधिक ग्लॅमरस आणि अधिक दिमाखदार स्वरूपात साजरा होणार आहे. ७ ते ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सॅनहोजे थिएटरमध्ये रंगणारा हा सोहळा केवळ मराठी चित्रपटांचा उत्सव राहणार नसून, अमेरिकेतील संपूर्ण भारतीय समुदायाला एकत्र आणणारा सांस्कृतिक महाकुंभ ठरणार असल्याची माहिती नाफाचे संस्थापक अध्यक्ष आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते निर्माते अभिजित घोलप यांनी दिली. मराठी चित्रपटसृष्टीचा दर्जा, वैभव आणि सांस्कृतिक समृद्धी उत्तर अमेरिकेतील नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या ध्येयातून स्थापन झालेल्या 'नॉर्थ अमेरिकन मराठी फिल्म असोसिएशन' (नाफा)ने अवघ्या काही वर्षांत अमेरिकेतील सर्वाधिक चर्चिल्या जाणाऱ्या भारतीय चित्रपट महोत्सवांमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. २०२६ मधील हा महोत्सव हॉलिवूडच्या रेड कार्पेट परंपरेची झलक, चित्रपटांचे भव्य प्रीमियर, कलाकारांशी थेट संवाद, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मनोरंजनाच्या विविध रंगांनी सजलेला असेल. अमेरिका आणि कॅनडामध्ये वास्तव्यास असलेल्या लाखो भारतीयांसाठी 'नाफा' हे आता केवळ एक व्यासपीठ नसून भारतीय चित्रपट, कला आणि संस्कृती यांना जोडणारा सशक्त सांस्कृतिक पूल बनला आहे. विशेषतः मराठी चित्रपटांना जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'नाफा'ने केलेल्या प्रयत्नांमुळे उत्तर अमेरिकेतील प्रेक्षकांना महाराष्ट्रातील चित्रपट त्याच दिवशी चित्रपटगृहात पाहण्याची संधी उपलब्ध झाली आहे. 'गुलकंद', 'सुजित सुशीला', 'संगीत मानापमान', 'चिकीचीकी बुबुम्बुम', 'पाणी', 'गुलाबी', 'नवरा माझा नवसाचा २', 'अशी ही जमवा जमावी', 'स्थळ' आणि 'सलतात रेशीम गाठी' यांसारख्या चित्रपटांना अमेरिकेत आणि कॅनडामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. विशेष म्हणजे तरुण पिढीचा वाढता सहभाग हा नाफाच्या यशाचा महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. अभिजित घोलप म्हणाले, अमेरिकेत भारतीय आणि विशेषतः मराठी चित्रपटसृष्टीसाठी स्वतंत्र आणि सक्षम व्यासपीठ निर्माण करण्याचे स्वप्न आम्ही पाहिले होते. आज नाफाशी एक हजारहून अधिक सदस्य जोडले गेले आहेत. कलाकार, दिग्दर्शक, लेखक, गायक, तंत्रज्ञ, सिनेमॅटोग्राफर्स आणि विविध क्षेत्रातील सर्जनशील व्यक्तींचा सहभाग वाढत आहे. नाफाच्या फिल्म क्लबद्वारे अनेक लघुपट आणि कलाकृतींची निर्मिती होत असून, उत्तर अमेरिकेत भारतीय चित्रपटसृष्टीचा नवा अध्याय लिहिला जात आहे.

नाफाच्या या प्रवासात प्रख्यात दिग्दर्शक, अभिनेते आणि कलावंतांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. त्यामुळेच अल्पावधीत नाफाने एक प्रभावी सांस्कृतिक चळवळ म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. निर्मितीसोबतच रेडिओसह ओटीटी क्षेत्रातही नाफाचा विस्तार झाला आहे.

महोत्सवाची शान अधिकच वाढवण्यासाठी यावर्षी मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मातब्बर कलावंत अमेरिकेच्या भूमीवर येणार आहेत. जेष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, महेश मांजरेकर, महेश कोठारे, अतुल कुलकर्णी, नागराज मंजुळे, गुरु ठाकूर, श्रुती मराठे आणि गिरिजा ओक यांची विशेष उपस्थिती महोत्सवाला चार चाँद लावणार आहे.

हॉलिवूडच्या झगमगाटासोबत भारतीय संस्कृतीचा अभिमान, मराठी चित्रपटसृष्टीची ताकद आणि भारतीय कलावंतांची सर्जनशीलता यांचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी देणारा 'नाफा २०२६' हा उत्तर अमेरिकेतील भारतीय समुदायासाठी वर्षातील सर्वात मोठा सांस्कृतिक आणि मनोरंजन सोहळा ठरणार



# माधुरी व अनिल कपूरची जोडी पुन्हा एकत्र?

बॉलीवूडची धक धक गर्ल अभिनेत्री माधुरी दीक्षित हिचा 'माँ बहन' चित्रपट नेटफ्लिक्सवर रिलीज झाला आहे. या चित्रपटाच्या स्क्रीनिंगला सिनेविश्वातील अनेक दिग्गज कलाकारांनी हजेरी लावली होती. त्यामध्ये अभिनेता अनिल कपूर यांची उपस्थिती विशेष चर्चेचा विषय ठरली. एकेकाळी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणारी माधुरी आणि अनिल यांची सुपरहिट जोडी पुन्हा एकत्र दिसल्याने चाहत्यांनी आनंद व्यक्त केला. ही जोडी पुन्हा एकदा एकत्रित पडद्यावर झळकणार का याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे. त्याबाबत माधुरी दीक्षितने एका मुलाखतीमध्ये स्पष्ट भूमिका मांडली आहे.

अभिनेत्री माधुरी दीक्षित व अनिल कपूर हे एकत्र स्क्रीनिंगमध्ये झळकल्यामुळे ते पुन्हा एकदा एकत्र काम करणार का याची चर्चा सुरू झाली आहे. माधुरी दीक्षितला तिने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीमध्ये अनिल कपूरसह काम करण्याबाबत विचारण्यात आले. त्यावर तिने स्पष्ट शब्दांमध्ये तिची भूमिका सांगितली आहे. अनिल कपूरसह एकत्र चित्रपट करण्यासाठी योग्य चित्रपट आणि कथा असणे गरजेचे आहे. यापूर्वी सुपरहिट चित्रपट दिल्यामुळे तोच वारसा पुढे तसाच राखला गेला पाहिजे, असे माधुरीने नमूद केले. माधुरी दीक्षित म्हणाली की, अनिल आणि मला अजूनही एकत्र काम करायला आवडेल; पण त्यासाठी चित्रपटाची गोष्ट चांगली असणे तितकेच महत्त्वाचे आहे. ती कथा अतिशय उत्तमरीत्या मांडलेली पाहिजे. त्याचे कारण म्हणजे यापूर्वी आम्ही अनेक चित्रपटांमध्ये एकत्र भूमिका साकारल्या असून, त्या प्रचंड गाजल्या आहेत. त्यामुळे यापुढे जर एकत्र काम करण्याची वेळ आली, तर चित्रपट आणि त्याची गोष्ट तितकीच चांगली असणे गरजेचे असल्याचे मत माधुरी दीक्षितने व्यक्त केले आहे.

पुन्हा एकदा स्क्रीन शेअर केली, तर काही जुन्या काही गोष्टींची उणीव भासेल का? याबाबत विचारण्यात आले. त्यावर माधुरी दीक्षित म्हणाली की, तसे काही नाही. कलाकारांसाठी अनेक गोष्टी आता जास्त सुधारल्या आहेत. पूर्वीपेक्षा आता जास्त सोई-सुविधा मिळत आहेत. आता प्रत्येकाला व्हॅनिटी व्हॅन आहे. शूटिंगच्या वेळी अनेक लोक एकत्र काम करत आहेत. डिजिटलसह अनेक टीम उपलब्ध आहेत. स्क्रिप्ट, डायलॉग्ज सगळे तयार मिळत आहे, एका कलाकाराला अजून काय पाहिजे, असे अभिनेत्री माधुरी दीक्षित म्हणाली.

अभिनेत्री माधुरी दीक्षित व अनिल कपूर यांच्या सुपरहिट जोडीने ८० व ९० चे दशक गाजवले आहे. 'तेजाब', 'राम लखन' व 'बेटा' या चित्रपटांमुळे माधुरी व अनिलची जोडी प्रचंड लोकप्रिय झाली. 'एक दो तीन', 'धक धक करने लगा' यांसारखी गाणी आजही चाहत्यांमध्ये तितकीच लोकप्रिय आहेत.



# अक्षय कुमार- रवीना पुन्हा दिसणार एकत्र

बॉलीवूडचा खिलाडी अक्षय कुमार पुन्हा एकदा 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटातून प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहे. या बहुचर्चित चित्रपटाच्या ट्रेलर लाँच सोहळ्याची सध्या सिनेविश्वामध्ये चर्चा रंगली आली आहे. या चित्रपटात एक्स गर्लफ्रेंड रवीना टंडनसह काम करीत असल्याबद्दल अक्षय कुमारला प्रश्न विचारण्यात आले. त्यावर त्याने दिलेल्या उत्तरांनी चाहत्यांसह माध्यमांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे. त्यामुळे एकेकाळी सर्वात चर्चेत असलेली रवीना टंडन व अक्षय कुमारची जोडी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. 'वेलकम टू द जंगल' चित्रपटामध्ये अक्षय कुमारने स्वतःला फ्लॉप ॲक्टर म्हटले आहे. त्याबाबत माध्यमांकडून प्रश्न विचारण्यात आला. अक्षय कुमारला चित्रपटात त्याच्यासाठी 'फ्लॉप अभिनेता' हा शब्द का वापरण्यात आला, याबाबत विचारण्यात आले. त्यावर असा संवाद केवळ चित्रपटाच्या कथानकाचा भाग म्हणून पाहायला हवा; वैयक्तिक टोमणा म्हणून नाही, असे उत्तर अक्षय कुमारने दिले आहे. अक्षय कुमार म्हणाला, चित्रपटातील हे असे संवाद कुणाला टोमणा मारण्यासाठी लिहिलेले नसतात. ते फक्त एका पात्रासाठी लिहिलेले असतात. चित्रपट करताना आम्ही एखादी भूमिका साकारत असतो. तुम्ही हुशार आहात. त्यामुळे चित्रपट पाहताना त्यातील पात्र व कथा लक्षात घेऊन पाहायला हवे. तुम्ही सर्वजण समजूतदार आहात आणि त्यामुळे हा संवाद इतका मनावर घेण्याची गरज नाही. माझ्याबद्दल वाईट वाटल्याबद्दल धन्यवाद; पण याकडे इतक्या गंभीरपणे पाहू नका, असे प्रत्युत्तर अक्षयने दिले. यावेळी माध्यमांनी कोणती एक गोष्ट रवीनामध्ये आजही बदलेली नाही, असे विचारले. त्यावर अक्षय म्हणाला की, रवीना ही अत्यंत प्रोफेशनल व्यक्ती आहे. अजूनही मला आठवते की, एका चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी सूर्यास्त होण्यासाठी फक्त काही मिनिटे बाकी राहिली होती आणि ग्रीन रूम लांब होती. तिथून पुन्हा कपडे बदलून येईपर्यंत उशीर झाला असता. त्यामुळे रवीना जनरेटर व्हॅनमध्ये गेली आणि अवघ्या काही मिनिटांत तिचा लूक बदलून आली. जी गोष्ट अशक्य वाटत होती, ती रवीनाने करून दाखवली होती, असा किस्सा अक्षय कुमारने सांगितला.

# करण जोहरचा 'तख्त' का झाला डबाबंद?

करण जोहरच्या बहुचर्चित सिनेमांपैकी एक असलेला 'तख्त' डबाबंद का झाला? हा प्रश्न इतक्या वर्षांपासून अनुत्तरित होता. सिनेमाची स्क्रिप्ट तयार होती, स्टारकास्टही फायनल झाली होती. शूटिंग सुरु होणारच होतं पण कोरोना आला आणि सगळंच थांबलं. नंतर सिनेमाचं काम पुन्हा सुरुच झालं नाही. आज सिनेमा डबाबंद झाला आहे. यश जोहर यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट होता जे करण जोहर पूर्ण करणार होता. आता नुकतंच सिनेमातील एका कलाकाराने सिनेमा डबाबंद होण्याचं कारण सांगितलं. 'तख्त'च्या स्टारकास्टपैकी एक माहिर पांधीने नुकतंच एक मुलाखत दिली. तो म्हणाला, तख्त हा काही साधासुधा सिनेमा नव्हता. मिस्टर यश जोहर यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट होता आणि याचं ऐतिहासिक कनेक्शन होतं. जेव्हा तुम्ही इतिहासाच्या आधारे एखादी स्क्रिप्ट लिहिता तेव्हा तुम्ही तथ्य बदलू शकत नाही. तो पुढे म्हणाला, जेव्हा कोरोना आला तेव्हा इतक्या सगळ्या कलाकारांना एकत्र आणणं आणि त्यांच्या तारखा जुळवणं खूप कठीण झालं. अगदी दोन वर्षांनंतर जरी सिनेमा प्लॅन केला तरी संपूर्ण स्टारकास्टला एकत्र आणणं अशक्य होतं. आणि आता आज जर तख्त बनवायला घेतला तर अख्खी स्क्रिप्ट बदलावी लागेल. कारण प्रेक्षक बदलले आहेत. हा सिनेमा २०० कोटींच्या बजेटमध्ये तयार होणार होता. या सिनेमाची ऑफर आली तेव्हा मी खूप खूश झालो होतो. इंडस्ट्रीत मला वेगळ्या नजरेने बघायला सुरुवात झाली होती, असंही तो म्हणाला. 'तख्त' हा ऐतिहासिक ड्रामा होता ज्याची घोषणा करण जोहरने २०२० मध्ये केली होती. सिनेमात रणवीर सिंह, आलिया भट, विकी कौशल, करीना कपूर, अनिल कपूर, जान्हवी कपूर अशी तगडी स्टारकास्ट दिसणार होती. मात्र आता ६ वर्ष झाली तरी सिनेमा पुन्हा सुरु होण्याची काहीच चर्चा नाही. मधल्या काळात करण जोहरने यावर भाष्य केलं होतं. 'सिनेमा पूर्णपणे बंद झालेला नाही. एक ना एक दिवस मी हा सिनेमा नक्की बनवणार. सुमित रॉयने सिनेमाची अप्रतिम स्क्रिप्ट लिहिली आहे', अशी त्याने प्रतिक्रिया दिली होती.





# ललित मोदींच्या बायोपिकमध्ये रणवीर सिंह?

बिझनेसमन आणि इंडियन प्रीमियर लीगचे माजी आयुक्त ललित मोदी यांच्या आयुष्याबद्दल लोकांमध्ये नेहमीच कुतूहल राहिले आहे. ललित मोदी यांनी आयपीएलची सुरुवात करत क्रिकेट विश्वामध्ये नवा इतिहास रचला होता. मात्र, यानंतर झालेल्या घडामोडींमुळे त्यांना देश सोडावा लागला. ललित मोदी यांचे आयुष्य एखाद्या चित्रपटाच्या कथेपेक्षा कमी नाही, त्यामुळे ललित मोदी यांच्या जीवनावर आधारित बायोपिक तयार केला जाणार आहे. याबाबत त्यांनी स्वतः घोषणा केली असून यामध्ये स्टार अभिनेता रणवीर सिंहने मुख्य भूमिका साकारण्याची तयारी दाखवल्याचे वक्तव्य केले आहे.


ललित मोदी यांनी मुलाखतींचा सपाटा लावला आहे. मुलाखतीमध्ये ललित मोदी म्हणाले, बायोपिकची तयारी सध्या सुरू आहे. चित्रपटाच्या कथालेखनाचे काम सुरू आहे. १०० हून अधिक इंटरव्ह्यू झाले आहेत. स्नेहा रजनी यांच्या नेतृत्वाखाली एक संपूर्ण टीम यावर काम करत आहे. पण, सध्या केवळ लेखनाचे काम सुरू आहे. मुलाखतीमध्ये पुढे त्यांना चरित्रपटामध्ये कोणत्या कलाकाराने भूमिका साकारावी असे वाटते, याबद्दल विचारले. यावर ललित मोदींनी उत्तर दिले की, रणवीर सिंहला माझी भूमिका साकारायची आहे. दोन ते तीन वर्षांपूर्वी तो स्वतः लंडनला मला भेटायला आला होता आणि यावेळी चित्रपटामध्ये काम करण्याबद्दल बोलला होता. मात्र, आता त्याला माझ्या चित्रपटामध्ये काम करण्यासाठी वेळ मिळाला पाहिजे, कारण तो आता मोठा झाला आहे. ललित मोदी म्हणाले, दोन वर्षांपूर्वी मला रणवीर सिंह खरंच माहिती नव्हता. मी दीपिका पादुकोणला ओळखत होतो, पण रणवीरला कधी भेटलो नव्हतो. मला एकाने रणवीर सिंह भेटण्यासाठी येत असल्याचे सांगितले आणि तो लंडनला आला. जर आयुष्यामध्ये कोणती एक भूमिका त्याला साकारायची असेल तर ती ललित मोदींची असल्याचे रणवीरने सांगितले होते. मी त्याला भूमिका करणार का विचारले नव्हते, पण तो प्रभावी अभिनेता आहे यामध्ये कोणतीही शंका नाही, त्यामुळे अजूनही त्याला माझ्या बायोपिकमध्ये काम करायचे आहे का हे बघावे लागेल, असे वक्तव्य ललित मोदींनी केले आहे. त्यामुळे ललित मोदी यांच्या आयुष्यावर आधारित बायोपिक चित्रपट तयार झाला तर प्रमुख भूमिकेमध्ये रणवीर सिंह दिसण्याची शक्यता आहे.

# रजनीकांतच्या 'जेलर-२' मध्ये 'या' अभिनेत्याची एन्ट्री!



बॉलिवूडसह टॉलिवूड गाजवणारे सुपरस्टार रजनीकांत यांनी आजवर अनेक चित्रपटांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. वयाच्या ७४ व्या वर्षीही त्यांच्या काम करण्याचा उत्साह कायम आहे. दरम्यान, रजनीकांत यांचा चाहतावर्ग कमालीचा मोठा आहे. प्रेक्षक त्यांच्या चित्रपटांची मोठ्या आतुरतेने वाट बघत असतात. सध्या ते त्यांच्या आगामी चित्रपट जेलर-२ मुळे चर्चेत आहेत. अशातच या चित्रपटासंबंधित एक अपडेट समोर आली आहे. ज्यामुळे देशभरातील सिनेरसिकांच्या आनंदाला उधाण आलं आहे. मिडिया रिपोर्टनुसार, बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान या चित्रपटात कॅमिओ करणार होता. शाहरुख खानच्या कॅमिओमुळे 'जेलर २' बऱ्याच काळापासून चर्चेत आहे. मात्र, काही कारणास्तव किंग खानने या प्रोजेक्टमधून माघार घेतली आहे. त्याच्या जागी दुसऱ्या एका अभिनेत्याची वर्णी लागली आहे. माहितीनुसार, जेलर-२ मध्ये शाहरुखला रिप्लेस करत त्याच्या जागी हृतिक रोशनला घेण्यात आलं आहे. आता लवकरच हृतिक चेन्नईमध्ये त्याच्या पुढील भागाचं शूटिंग पूर्ण करणार असल्याचं बोललं जात आहे. नेल्सन दिलीप कुमार दिग्दर्शित या चित्रपटाद्वारे हृतिक रोशन आणि रजनीकांत ४० वर्षांनंतर पुन्हा एकत्र येत आहेत. त्यामुळे या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहिली जात आहे. हृतिकच्या भूमिकेने 'जेलर २'च्या कथेत महत्त्वाचं वळण येणार असून त्याची ही भूमिका 'जेलर २'मधील महत्त्वपूर्ण भूमिकांपैकी एक असणार आहे. पण, अद्याप या चित्रपटातील तिच्या भूमिकेचं नाव कळलेलं नाही. त्यामुळे आता हृतिक यातून नेमक्या कोणत्या भूमिकेतून झळकणार, त्याच्या भूमिकेमुळे कथेत कसं वळण येणार हे पाहणं रंजक ठरेल. 'जेलर' हा चित्रपट २०२३ मध्ये प्रदर्शित झाला होता. रजनीकांत यांची मुख्य भूमिका असलेल्या 'जेलर' चित्रपटाने बॉक्स आता, त्याच्या सिक्वेलसाठीही प्रेक्षकांमध्ये प्रचंड क्रेझ दिसत आहे. 'जेलर २' मध्ये रजनीकांत प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. याशिवाय त्यांच्यासोबत जॅकी श्रॉफ आणि साउथ सुपरस्टार मोहनलाल झळकणार आहे. 'जेलर २'ची रिलीज डेट जाहीर झाली नसून लवकरच हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

# एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या बायोपिकमध्ये रश्मिका?



भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील दिग्गज गायिका एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या जीवनावर आधारित बायोपिकची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक गौतम तिन्नानुरी करणार असून, मुख्य भूमिकेसाठी अभिनेत्री रश्मिका मंदाना यांचे नाव आघाडीवर असल्याचे वृत्त समोर आले आहे. काही माध्यमांच्या अहवालानुसार, एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या भूमिकेसाठी रश्मिका मंदाना यांची निवड करण्यात आली आहे. यासाठी नुकतीच त्यांच्या घरी लूक टेस्टही घेण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे या चित्रपटात त्या महान गायिकेची भूमिका साकारण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, या भूमिकेसाठी यापूर्वी इतर अभिनेत्रींचीही नावे चर्चेत होती. सुरुवातीला साई पल्लवी यांचे नाव पुढे आले होते. त्यांनी या भूमिकेची तयारी म्हणून कर्नाटक संगीताचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केल्याची माहितीही समोर आली होती. त्यानंतर रुक्मिणी वसंत यांची निवड झाल्याच्या चर्चाही रंगल्या होत्या. त्यामुळे मुख्य भूमिकेसाठी नेमकी कोणाची निवड झाली आहे, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. विशेष म्हणजे, चित्रपट निर्मात्यांकडून किंवा दिग्दर्शकांकडून अद्याप कोणत्याही अभिनेत्रीच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे चाहत्यांना अंतिम घोषणेची प्रतीक्षा करावी लागणार आहे. या बायोपिकचे दिग्दर्शन गौतम तिन्नानुरी करणार आहेत. त्यांनी यापूर्वी 'जर्सी'सारखा गाजलेला चित्रपट दिग्दर्शित केला होता. एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या जीवनावरील हा चित्रपट वास्तवदर्शी आणि प्रभावी बनवण्यासाठी ते गेल्या काही काळापासून सखोल संशोधन करत असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, रश्मिका मंदाना तिच्या आगामी 'कॉकटेल २' या चित्रपटामुळेही चर्चेत आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून त्याला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. ट्रेलरला मिळालेल्या प्रेमाबद्दल रश्मिकाने सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांचे आभार मानले आहेत. 'कॉकटेल २' हा चित्रपट १९ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. होमी अदजानिया दिग्दर्शित या चित्रपटात शाहिद कपूर, कृती सेनन आणि रश्मिका मंदाना प्रमुख भूमिकांमध्ये दिसणार आहेत. आता एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या बायोपिकमध्ये मुख्य भूमिका कोण साकारणार, याकडे चित्रपटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# ‘दृश्य-अदृश्य’चा ट्रेलर प्रदर्शित

जागतिक पातळीवरील सिनेरसिकांच्या मनात रहस्यपटांचे एक वेगळे स्थान आहे. कित्येकदा समाजात घडणाऱ्या काही हृदयस्पर्शी घटनाच सिनेमाचे रूप घेऊन रुपेरी पडद्यावर दाखवल्या जातात, पण त्यातील रहस्य कायम रसिकांची उत्सुकता वाढवत राहते. मराठी चित्रपटसृष्टीला अशा रहस्यपटांची परंपरा लाभली आहे. ‘दृश्य-अदृश्य’ हा चित्रपट याच वाटेवरील महत्त्वाचा चित्रपट ठरणार आहे. ५६ व्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सवात कौतुकाची थाप मिळवणारा ‘दृश्य-अदृश्य’ हा चित्रपट १९ जून रोजी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. सुभेदार, शेर शिवराय आणि सापळा चित्रपटांच्या निर्मात्यांची भेट असलेल्या ‘दृश्य-अदृश्य’ या रहस्यमय चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. रहस्यमय कथा मराठीत मोठ्या संख्येने पाहायला मिळत नाहीत. या पार्श्वभूमीवर ‘दृश्य- अदृश्य’ची रहस्यमय कथा प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी असेल, असं या चित्रपटाचा ट्रेलर पाहून लक्षात येतं. नवऱ्याबरोबर झालेला आर्थिक व्यवहारांबद्दलचा संवाद आणि त्यानंतर दुसऱ्याच दिवशी आपल्या मुलीचे गायब होणे या प्रकाराने गोंधळलेल्या आणि सगळ्या प्रकरणाचा माग घेणाऱ्या तन्वीची कथा या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. पोलिसांचा तपास, कोण खरं बोलतंय- कोण जाळं विणतंय ही गुंतागुंत आणि भास- आभासाचा हा खेळ तन्वीबरोबर खेळला जातो आहे की तिनेच हा खेळ रचला आहे? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिलिंद लेले दिग्दर्शित ‘दृश्य-अदृश्य’ चित्रपटातून मिळणार आहे. मराठीसह हिंदी चित्रपटांमध्येही अभिनयाचा ठसा उमटवणारी अभिनेत्री पूजा सावंत या चित्रपटात तन्वीच्या भूमिकेत दिसणार आहे. पूजाने साकारलेली तन्वी आजवरच्या तिच्या भूमिकांपेक्षा खूपच वेगळी आहे. तिच्याबरोबर अशोक समर्थ, सुव्रत जोशी, हार्दिक जोशी, अक्षया गुरव, विद्याधर जोशी, केया इंगळे आदी मराठीतील आघाडीचे कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये आहेत. निर्माते प्रद्योत पेंढारकर, अनिल वर्खडे, दत्ताजी थोरात, धनंजय थोरात, पृथ्वीराज खेडकर, युवराज खेडकर आणि अश्विनी खेडकर यांनी आरएसटी कॅन्व्हास या बॅनरखाली ‘दृश्य-अदृश्य’ चित्रपटाची निर्मिती केली आहे.



# ‘लस्ट स्टोरीज ३’मध्ये राधिका मदान



राधिका मदान ‘सूबेदार’ या चित्रपटातील स्वत:च्या प्रभावी अभिनयामुळे सध्या कौतुकाची धनी ठरली आहे. आता राधिका ही शकुन बत्रा यांच्या ‘लस्ट स्टोरीज ३’साठी पूर्णपणे तयार असून यात ती अली फजलसोबत दिसून येणार आहे. शकुन बत्रा यांच्या चित्रपटाविषयी कळल्यावर मी ‘लस्ट स्टोरीज ३’साठी ऑडिशन दिली. देवाच्या कृपेमुळे मला ही संधी मिळाली. मी एक सरासरी अभिनय करण्याची जोखीम पत्करू शकत नाही. प्रत्येक भूमिकेसाठी अनेक लोक रांगेत उभे असतात. जर मी चांगला अभिनय सादर न केल्यास मला कुणीच दुसरी संधी देणार नाही. माझ्यासाठी प्रत्येक काम ‘करो या मरो’सारखे असते. या क्षेत्रात टिकायचे असल्यास मला दरवेळी सर्वोत्तम द्यावे लागणार असल्याचे उद्गार राधिकाने काढले आहेत. ऑडिशनसाठी मी रांगेत उभी राहिली आहे, अत्यंत मेहनत केली आहे. लोक मला कास्ट करण्याविषयी विचार करत नसल्यास मी स्वत: ऑडिशन मागते आणि यात मला कुठलाच कमीपणा वाटत नाही. ऑडिशनची संधीच न मिळाल्यास आणि केवळ माझ्या आडनावामुळे मला नाकारण्यात आल्यास त्रास होतो. जर मी ऑडिशन देऊन रिजेक्ट झाली तर वाईट वाटत नाही. याकरता मला पुन्हा रांगेत उभे रहावे लागले तरीही माझी तयारी आहे. मी एक कलाकार आहे आणि स्वत:च्या स्वप्नांसाठी काहीही करण्यास तयार असल्याचे राधिकाचे सांगणे आहे.



# प्राजक्ता माळीची साऊथमध्ये एन्ट्री

मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी आता आपल्या कारकिर्दीतील नव्या पर्वाला सुरुवात करत आहे. प्राजक्ता आता दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पदार्पण करण्यासाठी सज्ज झाली आहे. आता प्राजक्ता तेलुगू चित्रपटसृष्टीत झळकणार असल्याने चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. प्राजक्ताच्या आगामी तेलुगू चित्रपटाचे चित्रीकरण सध्या सुरू असून हा चित्रपट याच वर्षी प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. मात्र चित्रपटाची कथा, कलाकारांची फळी आणि प्राजक्ताची भूमिका याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. यासंदर्भातील तपशील लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. प्राजक्ता या चित्रपटात कोणत्या भूमिकेत दिसणार, तिचा लूक कसा असेल आणि ती कोणत्या दाक्षिणात्य कलाकारांसोबत स्क्रीन शेअर करणार, याबाबत चाहत्यांमध्ये विविध चर्चा रंगल्या आहेत. मराठी मनोरंजन विश्वात यशस्वी कारकीर्द घडवल्यानंतर आता तिच्या साऊथ इंडस्ट्रीतील नव्या प्रवासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, प्राजक्ताच्या करिअरची सुरुवात वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी ‘क्या मस्ती क्या धूम’ या रिॲलिटी शोमधून झाली होती. मात्र तिला खरी लोकप्रियता मिळाली ती छोट्या पडद्यावरील मालिकांमुळे. २०११ मध्ये ‘सुवासिनी’ मालिकेतून अभिनय क्षेत्रात पदार्पण केल्यानंतर २०१३ मध्ये ‘जुळून येती रेशीमगाठी’ मालिकेतील ‘मेघना देसाई’ या भूमिकेने तिला घराघरांत पोहोचवले. अभिनेत्री म्हणून यश मिळवल्यानंतर प्राजक्ताने निर्मिती क्षेत्रातही पाऊल ठेवले. तिची निर्मिती आणि भूमिका असलेला ‘फुलवंती’ चित्रपट चर्चेत राहिला. या चित्रपटातील नर्तकीची भूमिका साकारताना तिने भरतनाट्यम कौशल्याचाही प्रभावीपणे वापर केला. आता मराठीनंतर तेलुगू चित्रपटसृष्टीतही ती आपल्या अभिनयाची छाप उमटवण्यासाठी सज्ज झाली आहे.

# पाश्चात्त्य पदन्यास सम्राज्ञी: हेलन

**'नाम मेरा निंमो मुक्काम लुधियाना...' १९६१ च्या 'सपन सुहाने' चित्रपटात एका विवाह समारंभातील गाण्यात हेलन यांनी दृत व नटखट पदन्यासात आपली लुधियानाची ओळख करून दिली. भगवान दादा यांच्या अनोख्या नृत्यशैलीला हेलन यांनी आगळे विनोद गर्भित नृत्य कौशल्य प्रदर्शित करून रंगत भरली. 'रासा सायंग रे रासा सायंग सायंग रे...' १९६० सालच्या 'सिंगापूर'मध्ये मलेशियन व्हिलेज गर्लच्या पात्रात मलेशियन लोकगीतावर नृत्यात सिंगापुरी छत्रीसारख्या टोप्या घालून शम्मी कपूरसोबत दिलखेचक नृत्य सादर केले. 'हाँगकाँग चिना मिना सिंगापूर उड गयी दिलकी चिडिया फुर्रऽऽ' १९६२ सालच्या 'हाँगकाँग' सिनेमात सागर किनारी पार्टीत टाळ्या वाजवीत नाचत खूबसूरत हेलनचा प्रवेश होतो. आपल्या रोचक व उत्तेजक नृत्याने मेहफिलीत रंग भरते. नृत्य करताना 'तन मन, तन मन, फुर्रऽऽ' म्हणून धरलेला टाळ्यांचा ठेका अप्रतिम कौशल्याने सादर केला.**



'रंगीन बहारो से है गुलझार चायना टाऊन...' १९६२ सालच्या 'चायना टाऊन'मधील टायटल दाखविताना या टायटल साँगची सुरुवात होते. 'ओह चुन चुन चिना होते है प्यारे इशारे...' या कडव्याआधी टायटल संपते व हेलन यांचे विलोभनीय दर्शन होते. 'यम्मा यम्मा यम्मा तू परवाना मै शम्मा...' 'चायना टाऊन' सिनेमात डबल रोलमधील माईक नावाच्या गँगस्टर शम्मी कपूरसोबत प्रेयसीच्या भूमिकेतील विलोभनीय क्लब डान्स विलक्षण अदाकारीत सादर केला.

हेलन यांच्या नृत्यात निखळ किळसवाना अभिनय कधी दिसला नाही. नशिल्या पण मोहक चेहर्‍यावरील छद्मी हास्याची लकेर त्या वेगवेगळ्यारीतीने अभिनित करायच्या. 'मिस्टर जॉन वो बाब्बा खान ये लाला रोशनदास...' (बारीश-१९५७) कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात वरील नृत्य नाट्य हेलन यांनी ड्रम, पियानो व सेक्सोफोनच्या सुरात अनोख्या पदलालित्याचे प्रदर्शन करून प्रेक्षकांना खिळवून ठेवले. १९५९ सालच्या न्यू ईअर पार्टीत भोळे, अनाडी राज कपूर यांना सामील करून घेतात. 'ताज निराले राज निराले' ऐकून ते गडबडून जातात. हेलन त्यांच्या जवळ येऊन हॅलो म्हणताच, 'वो माय' म्हणत ते दूर होतात. हेलन नवीन जमान्याचे बदल गाण्यामधून अतिशय सूचक अभिनित करतात. 'ऐय्या करू मै क्या खसुकू सुकू...' (जंगली- १९६१) मिस सुकू नामे डान्सरच्या भूमिकेत शम्मी कपूरसोबत सपोर्टिंग नृत्याभिनय सादर केला. काली काली लटोन्से लिपटे गमे रुकसार पर एक पलके लिये रुक गये' नायक चंद्रशेखर या ओळी म्हणतानाचा हेलन यांचा गोड लाजरा अभिनय त्यांच्यातील बहुआयामिकत्व सिद्ध करतो. 'ओ हसीना जुल्फोवाली जाने जहाँ' (तिसरी मंझिल- १९६६) कॅबरे, रॉक अँड रोल व वेस्टर्न पॉप शैलीतल्या गाण्यात हेलन यांचा नृत्याविष्कार नुसता फुलून उठतो. त्यात साथीला शम्मी कपूर असताना ते नृत्य दिलखेचकच होते. 'पिया तू अब तो आजा...' १९७१ च्या 'कारवा'मधील या सर्वश्रुत गाण्यात आर. डी. बर्मन यांचा 'मोनिका' या गलबलून पण आर्ततेने भरलेल्या आवाजावर शोधक नजरेने हेलन 'देखो वो आ गया' म्हणत आनंद प्रदर्शित करून हे अजरामर नृत्यगीत सुरू होते. 'मेहबुबा मेहबुबा...' १९७५ च्या 'शोले'मधील हे गाणे. हेलन यांचा हबसी पेहराव, निर्धास्त व स्वैर गाणे या चित्रपटाची ओळख ठरले. आर. डी. बर्मन यांचा खर्जातला भारदस्त आवाज व हेलन यांचे हबसी रुबाबातले बिनधास्त थोडे उत्तेजक नृत्य, डाकूंच्या सान्निध्यातील भयपूर्ण वातावरणातही संमोहित करणारे होते. 'मेरा नाम चुन चुन चुन...' १९५७ सालच्या 'हावडा ब्रिज'मधील हे नृत्यगीत हेलन यांची प्राथमिक ओळख ठरले. त्या आधीचे अशा प्रकारच्या नृत्यातील सर्व मापदंड त्यांनी ओलांडले होते.

ओ. पी. नय्यर यांच्या दृत वाद्याच्या मधल्या इन्टरल्यूड पिसेसवरील नृत्याची थिरक त्या बेमालूम निर्माण करायच्या. 'मुंगडा मुंगडा मै गुडकी दली...' शेकडो चित्रपटात क्लब व हॉटेल्समध्ये कॅबरे व इतर वेस्टर्न नृत्यावर ज्यांचा पगडा होता अशा बहुगुनी हेलन यांनी १९७७ च्या 'इन्कार' चित्रपटात दारूच्या गावरानी गुत्यावर कोळिणीच्या पेहरावात दबंग स्त्रीच्या अंदाजात नृत्य सादर करताना तेज जोशिल्या गावरान अदाकारीने या नृत्य गीताला वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. त्यांच्या भरभराटीच्या काळात प्रत्येक निर्माता त्यांचे एखादे तरी नृत्य सिनेमात प्रस्तुत करायचे.



पाश्चात्त्य नृत्य करताना देशी-विदेशी वाद्याचा ह्रिदम, सिम्फोनी व हार्मोनी यांचा दृत परिणाम सांभाळून प्रसंगानुरूप अभिनयासहित सादर करावे लागते. हेलन या प्रकारात निपुण होत्या. नितळ सुदृढ गौरांग कांती व मासोळीसारखे नेत्र (मीनाक्षी) हे हेलन यांना लाभलेले वरदान. बॉल डान्स, बॅले डान्स, बीटल्स, कॅबरे आयटम साँग, मिक्स शास्त्रीय डान्स आदी अनेक आविष्कार सादर करून २५-३० वर्षे रसिकांना रिझविले. २१ नोव्हेंबर १९४० रोजी ब्रह्मदेशात रंगून येथे नृत्यांगना हेलन यांचा जन्म झाला. वडील अँग्लो इंडियन व आई ब्रह्मी होत्या. दुसर्‍या महायुद्धात वडील कामी आल्यावर हे कुटुंब काही काळ कलकत्ता येथे राहून मुंबईस आले. आईला नर्सिंग होममध्ये नोकरी लागली. हेलन शाळेत जाऊ लागली. एका मैत्रिणीमार्फत तत्कालीन नृत्यांगना कुक्कू यांची ओळख झाली. कुक्कू यांनी १९५१ साली 'रंगीली' चित्रपटात त्यांना काम मिळवून दिले. त्यांनी पाच-सहा चित्रपटात नायिका म्हणून व बर्‍याच चित्रपटात सहनायिका म्हणूनही कामे केलीत. १९५१ ते १९८३ पर्यंत जवळपास ६०० चित्रपटात योगदान दिले. हिम्मत तवाला (१९८३) हा अखेरचा चित्रपट. आजही अधूनमधून त्या दूरदर्शनवर दिसतात. हेलनच्या आयुष्यात पी. एन. अरोरा नामक एक निर्माता काही काळ आला होता. १९८० साली सलीम खान यांच्यासोबत राहणे पसंत केले. त्यांची दुसरी पत्नी म्हणून आजही त्या खुशहाल जीवन जगत आहेत. हेलन यांना सर्वश्रेष्ठ सहायक अभिनेत्रीचे दोन वेळा फिल्म फेअर अवॉर्ड मिळाले. भारत सरकारतर्फे २००९ साली पद्मश्री पुरस्काराने त्यांचा गौरव झाला.

**रमेश पोफळी**

# तिला मी हवा आहे आणि, मी...

तब्बू ही बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. पहला पहला प्यार, विजयपथ, प्रेम, हिंमत अशा अनेक सिनेमांतून तिने प्रेक्षकांचे मनोरंजन केले. तिने अनेक लोकप्रिय कलाकारांबरोबर काम केले आहे. अजय देवगणबरोबर तिने 'दृश्यम', 'गोलमाल अगेन', 'भोला' आणि 'औरों में कहाँ दम था' यांसारख्या अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. विशेष म्हणजे फक्त स्क्रीनवरच त्यांची केमिस्ट्री गाजली नाही तर खर्‍या आयुष्यात त्यांचे उत्तम बॉण्डिंग आहे. त्यांच्यातील मैत्री अनेकदा लक्ष वेधून घेते. अजय व तब्बू गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकांना ओळखतात. चित्रपटसृष्टीत येण्याआधीपासून त्यांची एकमेकांशी ओळख आहे. विविध मुलाखतींमध्ये जेव्हा ते एकत्र हजेरी लावतात, त्यावेळी ते एकमेकांचे किस्से सांगतात. एका मुलाखतीत तब्बूला पती म्हणून कसा मुलगा हवा आहे? असा प्रश्न विचारला होता. यावर अजय देवगण मजेशीरपणे म्हणालेला, तब्बूला मी हवा आहे आणि मी तिला मिळू शकत नाही, अजयच्या या वक्तव्यावर त्याच्यासह तब्बूही हसली होती. त्यानंतर अजय म्हणाला, माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की माझ्यासारखा कोणीतरी तिला हवा आहे. पण, माझ्यासारखा दुसरा व्यक्ती या जगात नाही.



अजय व तब्बू यांच्यात उत्तम मैत्री असल्याचे वेळोवेळी दिसते. तसेच, तेही त्यांच्या मैत्रीबद्दल अनेकदा सांगतात. मात्र, तब्बू व लोकप्रिय दाक्षिणात्य अभिनेते नागार्जुन यांच्या रिलेशनशिपबद्दल अनेकदा चर्चा होताना दिसते. नागार्जुन यांना त्यांच्या पत्नीला घटस्फोट द्यायचा नव्हता. त्यामुळे तब्बूने नात्यातून माघार घेतली. मात्र, दोघांनीही अधिकृतपणे यावर कधीही प्रतिक्रिया दिली नाही. आता या सगळ्यानंतर नागार्जुन व तब्बू पुन्हा एकदा एकत्र काम करताना दिसणार आहेत. नागार्जुन यांनी त्यांच्या १०० व्या सिनेमाची घोषणा केली. आता या प्रोजेक्टमध्ये तब्बूदेखील महत्वाच्या भूमिकेत दिसणार असल्याचे म्हटले जात आहे. चाहते या दोघांना पुन्हा एकदा स्क्रीनवर पाहण्यासाठी उत्सुक आहेत.

# 'खलनायक रिटर्न'मध्ये जॅकी दिसणार का?

नवदच्या दशकात एका चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला होता. विशेष म्हणजे या चित्रपटात नायकाइतकीच खलनायकाची भूमिकाही प्रचंड गाजली होती. हा चित्रपट म्हणजे 'खलनायक.' बल्लू, गंगा आणि राम या तिघांभोवती फिरणाऱ्या या कथेने प्रेक्षकांना खिळवून ठेवले होते. ॲक्शन, ड्रामा आणि गाण्यांमुळे 'खलनायक' सुपरहिट ठरला होता. संजय दत्त, माधुरी दीक्षित आणि जॅकी श्रॉफ त्या काळात प्रचंड लोकप्रिय झाले होते. आता पुन्हा एकदा हे तिघे



एकत्र काम करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले असून, 'खलनायक रिटर्न'मध्ये ते एकत्र काम करणार असल्याचे बोलले जात आहे. यावर जॅकी श्रॉफ यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. अभिनेते जॅकी श्रॉफ हे सहा वर्षांनंतर चित्रपटामध्ये पुनरागमन करत आहेत. २०२० मध्ये रिलीज झालेल्या 'बागी' चित्रपटानंतर आता जॅकी 'वेलकम टू द जंगल' चित्रपटामध्ये झळकणार आहेत. तीन दशकांनंतर आजही जॅकीची लोकप्रियता आणि क्रेझ कमी झालेली नाही. रोमँटिक हिरो म्हणून त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. जॅकी श्रॉफ यांचा १९९४ साली प्रदर्शित झालेला 'खलनायक' चित्रपट सुपरहिट ठरला होता. चित्रपटातील गाणी जबरदस्त गाजली होती, त्यामुळे 'खलनायक' चित्रपटाच्या सिक्वेलची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. 'खलनायक रिटर्न'बाबत चर्चा सुरू असताना जॅकी यामध्ये झळकणार का याची उत्सुकता निर्माण झाली आहे. याबाबत अद्याप माझ्यापर्यंत चित्रपटाची स्क्रीप्ट आलेली नाही, अशी प्रतिक्रिया जॅकी श्रॉफ यांनी दिली आहे. जॅकी यांनी मुलाखतीमध्ये म्हणाले की, 'खलनायक' चित्रपटाच्या दुसऱ्या भागाबद्दल अद्याप कोणतीही चर्चा झालेली नाही. अजून माझ्यापर्यंत स्क्रीप्ट पोहोचलेली नाही. संजूबाबाचे 'खलनायक'मधील पोस्टर्स तर आधीच प्रदर्शित झाले आहेत; आता फक्त पोलिस अधिकारी राम सिन्हा आणि त्यांची धर्मपत्नी मागे राहिले आहेत, अशी मिश्कील टिप्पणी जॅकी श्रॉफने केली आहे. याचबरोबर अभिनेत्री माधुरी दीक्षितने 'खलनायक' चित्रपटाच्या सिक्वेलबाबत प्रतिक्रिया दिली होती. माधुरीने दिलेल्या मुलाखतीमध्ये सध्या तरी निर्मात्यांशी तिच्या कास्टिंगबाबत कोणतीही चर्चा झालेली नसल्याचे सांगितले आहे.



# लोक माझ्या मरणाची वाट बघत आहेत!

बॉलिवूड मल्याळम चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री आणि टीव्ही होस्ट ज्वेल मॅरी सध्या सोशल मीडियावर पसरलेल्या एका खोट्या बातमीमुळे चर्चेत आली आहे. 'कॅन्सरशी झुंज देत असलेल्या ज्वेल मॅरीचे निधन झाले आहे', अशी अफवा गेल्या काही दिवसांपासून इंटरनेटवर पसरवली जात होती. इतकेच नव्हे तर तिच्या अंत्यसंस्काराची माहिती देखील सोशल मीडियावर व्हायरल केली गेली. त्यामुळे स्वतः अभिनेत्री ज्वेल मॅरीला समोर येऊन यावर स्पष्टीकरण द्यावे लागले आहे. ज्वेल मॅरीने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत ती जिवंत आहे, असं सांगितलंय. तिने चाहत्यांना आवाहन केले आहे की, खात्री केल्याशिवाय कोणत्याही दिशाभूल करणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवू नका. तिने इन्स्टाग्रामवर ट्रेडमिलवर धावतानाचा एक व्हिडिओ शेअर करत तिच्या फिटनेसचा पुरावा दिला आहे. व्हिडिओमध्ये तिने म्हटले, माझं निधन झालं नाही. गेल्या काही दिवसांपासून काही लोक माझ्या मरणाची वाट बघत आहेत आणि आता तर माझ्या अंत्यसंस्काराची कार्ड छापण्यापर्यंत काही लोकांची मजल गेली आहे. हे लोक असा दावा करत आहेत की, मी अत्यवस्थ अवस्थेत असून मला अंथरुणावरुन साधे हलताही येत नाहीये. ज्वेल मॅरीच्या मते, याच जुन्या कार्यक्रमातील तिच्या बोलण्याचा विपर्यास करून काही लोक खोट्या कॅप्शनसह ती आता या जगात नाही असं म्हणत आहेत. ती म्हणाली, मी सध्या इथेच आहे, जिवंत आहे आणि आनंदी आहे. त्यामुळे सध्या तरी तुम्ही माझ्या मृत्यूची बातमी विसरून जा. २०२३ मधील त्या प्रसंगाची आठवण करून देत अभिनेत्री म्हणाली, मी एका दिवशी माझ्या रुटीन चेकअपसाठी हॉस्पिटलमध्ये गेले होते. मला खोकताना खूप कफ पडायचा. डॉक्टरांनी मला स्कॅनिंग करण्याचा सल्ला दिला आणि रिपोर्ट आल्यावर काहीतरी गंभीर असल्याचे समजले. रिपोर्ट पाहून माझे हात पाय थंड पडले होते. डॉक्टरांनी बायोप्सी करण्याचा सल्ला दिला आणि त्या रिपोर्टमध्ये मला कॅन्सर असल्याचा धोका समोर आला होता. मात्र, आता ती या आजारातून पूर्णपणे बरी झाली आहे, असे सांगितले आहे.

# 'डॉन ३'च्या वादात सलमान खानची एन्ट्री!

'डॉन ३'मुळे रणवीर सिंग आणि फरहान अख्तर यांच्यात वादाची ठिणगी पडली आहे. शूटिंग सुरू होण्याच्या १० दिवस आधीच 'डॉन ३'मधून रणवीरने एक्झिट घेतल्याने या वादाला तोंड फुटलं आहे. रणवीरने ऐनवेळी सिनेमातून माघार घेतल्याने फरहान अख्तरला मोठ्या नुकसानाला सामोरं जावं लागणार आहे. याप्रकरणी फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉइजने रणवीरला असहकाराची नोटीस बजावली आहे. तर फरहान अख्तरने रणवीरकडे ४० कोटींच्या नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

फरहान अख्तर आणि रणवीर सिंगच्या या वादात आता भाईजानची एन्ट्री झाली आहे. रणवीर आणि फरहानच्या वादाची संपूर्ण इंडस्ट्रीमध्ये चर्चा आहे. त्यामुळेच त्यांच्यातील वाद मिटवण्यासाठी भाईजानने आता यात उडी घेतली आहे. रणवीर सिंग आणि फरहान अख्तर दोघांशीही सलमानचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. रिपोर्टनुसार, सलमान खानने रणवीर आणि फरहान या दोघांशीही चर्चा केल्याची माहिती आहे. आपापल्या प्रोजेक्टचं, कामाचं नुकसान होऊ न देता यावर तोडगा काढण्याचा सल्ला सलमानने फरहान आणि रणवीरला दिला आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, सलमानने फरहानची समजूत घातली आहे. क्रिएटिव्ह मतभेद ही जुनी गोष्ट आहे, ते होतच राहतात. याशिवाय सलमानने रणवीर सिंगसोबतही बराच काळ यावर चर्चा केल्याची माहिती आहे. कोणाचंही मन न दुखावत सलमान फरहान आणि रणवीरमधला वाद मिटवण्याचा प्रयत्न करत आहे. याआधी आमिर खाननेही रणवीर आणि फरहानला समजवण्याचा प्रयत्न केला होता.



# हुमा कुरेशी दिसणार खतरनाक भूमिकेत

अभिनेत्री हुमा कुरेशी ही हिंदी चित्रपटसृष्टीतील नावाजलेली अभिनेत्री आहे. 'गँग ऑफ वासेपूर','डेढ़ इश्किया','बदलापूर' या चित्रपटातून व ओटीटीवरील वेबसीरीज 'लीला' आणि 'महाराणी' मधून आपल्या अभिनयाने चित्रपटप्रेमींच्या मनात तिने विशेष स्थान निर्माण केलं. अलिकडेच या सिनेविश्वात या अभिनेत्रीच्या नावाची चांगलीच चर्चा आहे.

हुमा कुरेशी लवकरच एका नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'बेबी डू डाई डू' असं या चित्रपटाचं नाव आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर रिलीज करण्यात आला आहे. ज्याने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. 'बेबी डू डाय डू' हा हुमा कुरेशी आणि तिचा भाऊ साकिब सलीम यांच्या 'सलीम सिब्लिंग्स' या निर्मिती संस्थेचा पहिला चित्रपट आहे. हुमा कुरेशीने यात एका सिरिअल किलरची भूमिका साकारली आहे.



मुंबईत एकामागोमाग एक हत्या घडतात. पण, यामागचा खरा सुत्रधार कोण आहे? हे कोणालाच माहित नसतं. पोलीस आणि मीडियाला देखील याचा थांगपत्ता लागत नाही. ही कथा एक महिलेच्या भोवती फिरणारी आहे. जी मुकी आणि कर्णबधिर आहे. गर्दी में भी लोनली है, सब में वन अँड ओनली है..., असं कॅप्शन देत हा टीझर सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. या टीझरची सुरुवात एका मुलीच्या आवाजाने होते. ज्यामध्ये ती महिला मुलगी म्हणते, ही कथा माझ्या हत्येच्या रात्री सुरू होते, पण ही कथा माझ्याबद्दल नाही.

ही कथा माझ्या कर्णबधिर आणि मुक्या बहिणीबद्दल आहे. त्यानंतर, हुमा कुरेशीची एन्ट्री होते. 'बेबी डू डाय डू'चा टीझर खरोखरच अंगावर काटा आणणारा आहे. टीझरमधील अभिनेत्रीचा लूक तिचा अंदाज पाहून या चित्रपटाबाबत प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. दरम्यान, 'बेबी डू डाय डू'चे दिग्दर्शन नचिकेत सामंता यांनी केले असून, हा चित्रपट ३ जुलै रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# सनी देओलच्या 'बंटवारा १९४७'ची रिलीज डेट जाहीर



अभिनेता सनी देओलच्या आगामी चित्रपटाचे नाव बदलण्यात आले आहे. जेव्हापासून या चित्रपटाची घोषणा झाली आहे, तेव्हापासून याच्याशी संबंधित प्रत्येक अपडेटवर लक्ष ठेवले जात आहे. आधी या चित्रपटाला 'लाहोर १९४७' म्हटले जात होते, जे आता बदलून 'बंटवारा १९४७' करण्यात आले आहे. इन्स्टाग्रामवर एक मोशन पोस्टर शेअर करत याची घोषणा केली आहे. 'बंटवारा १९४७' या चित्रपटाच्या रिलीज डेटचा खुलासा करण्यात आला आहे. हा चित्रपट यंदा स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर रिलीज होईल.

आमिर खान प्रॉडक्शन्सने सोशल मीडियावर चित्रपटाच्या रिलीज डेटची घोषणा केली आहे. या पोस्टसोबत कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'द्वेष आणि भीतीच्या वातावरणात त्यांनी धैर्याचा मार्ग निवडला. १४ ऑगस्ट २०२६ पासून चित्रपटगृहांमध्ये 'बंटवारा' पहा'. या चित्रपटात सनी देओलसोबत प्रिती झिंटा, शबाना आझमी, अली फझल आणि सनीचा मुलगा करण देओल मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. हा चित्रपट प्रसिद्ध दिग्दर्शक राजकुमार संतोषी दिग्दर्शित करत आहेत. दरम्यान, या चित्रपटाची कथा भारत- पाकिस्तान फाळणीवर आधारित असणार आहे. हा टीझर अत्यंत भावूक करणारा आहे. सनी देओल हातामध्ये पेटती मशाल धरलेले दिसत आहेत. प्रीती झिंटा आणि इतर कलाकारही यात आहेत.

सर्वांच्याच चेहऱ्यावर एक भीती पाहायला मिळत आहे. फाळणीच्या आगीत लोकांचे आयुष्य कशा प्रकारे होरपळून निघाले होते, हे या टीझरमधून लक्षात येते. विशेष म्हणजे या चित्रपटाच्या माध्यमातून अभिनेत्री प्रिती झिंटा बर्याच वर्षांनंतर अभिनय क्षेत्रात पुनरागमन करत आहे.

# मी प्रेमाची निवड केली!



बॉलीवूड अभिनेत्री भाग्यश्री 'राजा शिवाजी' सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला आली. या सिनेमात तिने जिजाऊंची भूमिका साकारली होती. तिच्या भूमिकेला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले. भाग्यश्रीला तिच्या पहिल्याच मैंने प्यार किया या सिनेमातून प्रचंड लोकप्रियता ०मिळाली होती. या सिनेमात तिच्याबरोबर सलमान खान मुख्य भूमिकेत होता. प्रचंड लोकप्रियता मिळाल्यानंतरही अभिनेत्रीने सिनेसृष्टीपासून दूर जाण्याचा निर्णय घेतला. तिने २० व्या वर्षी उद्योगपती हिमालय दासानी यांच्याबरोबर लग्नगाठ बांधली. एका मुलाखतीत भाग्यश्री म्हणाली, मी खूप लहान होते आणि प्रेमात बुडालेले होते. मला लग्न करायचं होतं आणि माझ्या कुटुंबावर लक्ष द्यायचं होतं. जेव्हा चित्रपट प्रदर्शित झाला, त्यावेळी माझं लग्न झालं होतं, मी प्रेग्नंट होते. कारण चित्रपटाचं शूटिंग आणि तो प्रदर्शित होण्याचा काळ यामध्ये एक वर्षाचं अंतर होतं. प्रेमाची निवड करणं, लग्न करणं किंवा चित्रपट मिळवणं आणि प्रेम विसरून जाणं यापैकी मी माझ्या प्रेमाची निवड केली. प्रेमाला मी प्राधान्य दिलं. तेव्हा दोन्ही गोष्टी एकत्र मिळवणं शक्य नव्हतं. भाग्यश्री म्हणाली, एकजण माझ्याकडे आले आणि म्हणाले की, त्यांना माझ्याबरोबर एक चित्रपट बनवायचा आहे. त्या सिनेमात माझ्या पतीनं माझ्या प्रियकराची भूमिका करावी, अशी इच्छा आहे. मी विचार केला, का नाही? ते करायला सर्वांत सोपं वाटलं. प्रेक्षकांना काय वाटेल याचा मी विचार केला नाही. आजही मला त्यासाठी टीका सहन करावी लागते; पण ठीक आहे. तरुणपणी तुमच्याकडून खूप चुका होतात आणि ही चूक त्यापैकीच एक होती. त्यानंतर भाग्यश्री मुख्य प्रवाहातील सिनेमांपासून दूर गेली. तिच्या निर्णयामुळे त्या काळातील काही मोठे चित्रपट निर्माते निराश झाले होते. ती म्हणाली की, यशजी मला ओरडले होते. मनमोहन देसाई मला म्हणालेले की भाग्यश्री, फक्त हो म्हण आणि मी उद्या चित्रपटाची घोषणा करेन. पुढे भाग्यश्री म्हणाली, मला मी घेतलेल्या निर्णयांचा पश्चात्ताप नाही; पण त्यांच्याबरोबर काम करायला मिळायला पाहिजे होते, अशी एक इच्छा होती. घेतलेल्या निर्णयामुळे, मी काही महान चित्रपट निर्मात्यांसोबत काम करण्याची संधी गमावली. पण आयुष्य पुढे जातं आणि तुम्ही मागे वळून पाहत बसायचं नसतं, असेही ती म्हणाली.